# महाराष्ट्राने 'दादा' व्यक्तिमत्व गमावले; विमान अपघातात मृत्यू

# उपमुख्यमंत्री अजित पवारांसह ५ जणांचा दुर्दैवी मृत्यू


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - ४ थे | अंक - ८ वा | अमरावती (महाराष्ट्र) | बुधवार दि. २८ जानेवारी २०२६ | संपादक - डॉ. शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -४




विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८बारामती–** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा बुधवारी (२८ जानेवारी) लँडिंगदरम्यान अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये अजित पवार यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती डीजीसीएने दिली आहे. अजित पवारांच्या मृत्यूची बातमी कळताच संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. अजित पवार यांची बुधवारी बारामतीमध्ये सभा होती. या अपघातात सुरुवातीला अजित पवार गंभीर जखमी झाल्याचे सांगण्यात येत होते. अजित पवार यांच्यासोबत त्यांचे सुरक्षा रक्षक आणि वैमानिक होते. सकाळी ८.४६ दरम्यान हा अपघात झाल्याची माहिती समोर आली असून या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र दुःखाच्या महासागरात बुडाला आहे. डीजीसीएने दिलेल्या अधिकृत माहितीनंतर अजित पवार यांच्या मृत्यूच्या बातमीवर शिक्कामोर्तब झाले आहे.

डीजीसीएने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे विमानात होते. त्यांच्यासोबत इतर दोन लोक म्हणजे एक पीएसओ आणि एक अटेंडंट तसेच दोन क्रू मेंबर्सही होते. सुरुवातीच्या माहितीनुसार, अपघातात विमानातील कोणीही वाचले नाही. दरम्यान, ही माहिती येताच खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार सुनेत्रा पवार या दिल्लीवरून पुण्याकडे रवाना झाल्या आहेत. दरम्यान, राज्यामध्ये पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद निवडणुकीसाठी रणधुमाळी सुरू आहे. बुधवारी अजित पवार यांचा बारामती दौरा होता. या बारामती दौऱ्यासाठी ते सकाळी बारामतीसाठी प्रस्थान केले होते. बारामतीमध्ये विमान लाँडिंग होत असतानाच विमानामध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने विमान अपघातग्रस्त झाले. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ यांनी माध्यमांसमोर आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या अश्रूंचा बांध फुटल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी आम्ही पोरके झाल्याचे मत व्यक्त केले. दरम्यान, प्रफुल पटेल यांनाही माहिती कळताच अश्रूंचा बांध फुटल्याचे दिसून आले.

**विमान अपघातात यांचा मृत्यू–** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अंगरक्षक विदीप जाधव, पिंकी माळी तसेच कॅप्टन सुमित कपूर आणि कॅप्टन शांभवी पाठक यांचा समावेश आहे.

**महाराष्ट्र सुन्न झाला–** राज्याचे उपमुख्यमंत्री आणि लाडके नेते अजित पवार यांच्या निधनाची बातमी कळताच संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. त्यांच्या अकाली निधनाने संपूर्ण पुणे बारामतीच्या नागरिकांनी हंबरडा फोडला आहे. तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेत्यांनी पोरके झाल्याची भावना व्यक्त केली आहे.

**अजित पवारांसोबत विमानात नेमके कोण होते?**

राज्याच्या राजकारणातून एक अत्यंत सुन्न करणारी आणि धक्कादायक बातमी समोर येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला बारामती विमानतळावर लँडिंग दरम्यान भीषण अपघात झाला असून, या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह त्यांच्यासोबत असलेल्या अन्य पाच जणांचा मृत्यू झाला आहे. या बातमीमुळे संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे.

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचारासाठी अजित पवार आज आपल्या बालेकिल्ल्यात म्हणजेच बारामतीच्या दौऱ्यावर होते. आज दिवसभरात त्यांच्या चार भव्य सभांचे आयोजन करण्यात आले होते. या नियोजित दौऱ्यासाठी ते सकाळी विमानाने बारामतीला पोहोचले. मात्र, विमानतळावर उतरत असताना लँडिंग दरम्यान हा भीषण अपघात झाला.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, बारामती येथे झालेल्या विमानाचा अपघात अत्यंत भीषण होता. या विमानात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह एकूण ५ व्यक्ती होत्या. अजित पवार यांच्यासोबत त्यांचे एक पी.एस.ओ. आणि एक सहाय्यक प्रवास करत होते. विमानाचे नियंत्रण करण्यासाठी दोन क्रू मेंबर्स, ज्यात मुख्य पायलट आणि सह-पायलट यांचा समावेश होता. डीजीसीएने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, या भीषण क्रॅश लँडिंगमध्ये विमानातील कोणीही वाचू शकलेले नाही. विमानातील पाचही जणांचा या दुर्घटनेत मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे.

**राजकीय वर्तुळात खळबळ**

अजित पवार यांच्यासारख्या ताकदीच्या नेत्याचा अशा अपघाती निधनामुळे राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच बारामतीसह संपूर्ण महाराष्ट्रात शोक व्यक्त केला जात आहे.

## आयुष्य नीट जगा, मस्तपैकी राहा अन...;

### मृत्यूपूर्वी अजित पवारांनी दिलेला 'तो' अखेरचा सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८बारामती –** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अकाली निधन झाले आहे. बारामती येथील विमान अपघातात अजित पवारांसह ५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात अजित पवारांसारखा नेता महाराष्ट्राने गमावला आहे. अजित पवारांच्या जाण्याने महाराष्ट्र शोकाकुल झाला आहे. कालपर्यंत राजकारणात सक्रीय असणारे अजित पवार आज सकाळी या जगात नाहीत यावर कुणाचा विश्वास बसत नाही. अलीकडेच अजित पवारांनी एका भाषणावेळी लोकांना सल्ला दिला होता. हा सल्ला पुन्हा व्हायरल झाला आहे.

चाकण येथील जाहीर सभेत अजित पवार म्हणाले होते की, राजकारण लय वंगाळ आहे. जमिनीचे पैसे आले असतील तर राजकारणात पडू नका. धंदा-पाणी करा, मस्तपैकी राहा, मुलाबाळांना चांगलं शिकवा आणि निर्व्यसनी जीवन जगा. काहींना जमिनीचे पैसे आले की लगेच राजकारणात उडी घ्यायची हौस होते. बायकोला उभं करा, तू निवडणूक लढ..असं करू नका. पैसे संपले की काय करणार? दोन हाताला चुना लावून 'ठो-ठो' करणार? त्याचा काहीच उपयोग नाही, साधुसंतांनीही आपल्याला तेच सांगितले असल्याचे नमूद करत अजित पवारांनी धंदा-पाणी सांभाळा, आयुष्य नीट जगा असा सल्ला लोकांना दिला होता.

**पवार कुटुंबावर मोठा आघात** अजित पवारांच्या जाण्याने महाराष्ट्राने उमदा नेता गमावला. राजकारणात टीका होते, अजित पवार फार कमी टीका करायचे. त्यांनी वेगळी भूमिका घेतली तेव्हा आम्ही टीकेचे बाण सोडले. ते शांत राहून काम करत राहिले. राजकारणात अशी माणसे दुर्मिळ असतात. अत्यंत उमद्या वयात ते आपल्यातून निघून गेले. राजकारणात



फार मोठी खेळी ते करू शकले असते. अलीकडेच अजित पवार आणि शरद पवार एकत्र आले त्याचा आनंद सगळ्यांना झाला, कार्यकर्त्यांना होता. काका पुतणे एकत्र आले त्याचा आम्हाला आनंद होता पण हा आनंद फार काळ टिकला नाही. राजकारण कोणत्याही स्तराला गेले तरी पवार कुटुंब अभेद्य राहिले. पवार कुटुंबावर हा सगळ्यात मोठा आघात आहे. शरद पवारांनंतर अजित पवार कुटुंबाचे कर्ते पुरुष होते. अशा कर्त्या पुरुषाचे जाणे यासारखे भीषण दुःख कशात नाही असं सांगत संजय राऊतांनी अजित पवारांच्या निधनावर शोक व्यक्त केला.

**बारामतीत शेवट–** ज्या बारामतीतून अजित पवारांनी त्यांच्या राजकारणाची सुरुवात केली. त्याच बारामतीत अजित पवारांचे अकाली निधन होणे हा विचित्र योगायोग समोर आला. अजित पवार हे प्रशासनावर पकड असलेले नेते म्हणून ओळखले जायचे. सकाळी ६ वाजल्यापासून ते कामाला सुरुवात करायचे. विकास कामांची पाहणी दौरा असेल, अगदी सकाळी ते रस्त्यावर फिरून लोकांची कामे सोडवताना दिसायचे. आज मुंबईतून बारामतीला ते चालले होते. मात्र आजची सकाळी त्यांच्या आयुष्यातील शेवटची सकाळ ठरली आहे. ज्या बारामतीत त्यांचा जन्म झाला तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे.

## १०० फुटांवरून विमान कोसळलं, वाचवायला गेले पण...;

### प्रत्यक्षदर्शीने सांगितला अजित पवारांच्या अपघाताचा थरार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८बारामती –**

विमान खाली येत असतानाच ते कोसळणार असं वाटलं होतं आणि क्षणार्धात तेच झालं... डोळ्यांदेखत विमानाचा मोठा स्फोट झाला... हे शब्द आहेत बारामती विमानतळावर घडलेल्या त्या भीषण अपघाताच्या प्रत्यक्षदर्शींचे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या अपघाताने केवळ बारामतीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे. बारामतीमध्ये सकाळी ८.४५ वाजण्याच्या सुमारास अजित पवार यांच्या विमानाला अपघात झाला आणि त्यात उपमुख्यमंत्र्यांसह पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

**आम्ही वाचवण्यासाठी धावलो, पण...**



अपघाताच्या वेळी घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका प्रत्यक्षदर्शीने दिलेली माहिती अंगावर शहारे आणणारी आहे. त्यांनी सांगितले की, स्वतःच्या डोळ्यांनी हा अपघात पाहिला. खूप दुःखद घटना होती. विमान लँडिंगसाठी खाली येत होते, तेव्हाच काहीतरी अघटित घडणार याची जाणीव झाली. विमान खाली येताना वाटत होतं की ते कोसळेल आणि तितक्यातच ते कोसळले आणि त्यात फोटो स्फोट झाला. आम्ही मदतीसाठी धावलो, पण विमानाने भीषण पेट घेतला होता. आम्ही जवळ पोहोचलो तेव्हा विमानात एकापाठोपाठ एक ४ ते ५ भीषण स्फोट झाले.

मदत करणेही झाले अशक्य

विमानाला लागलेली आग इतकी रौद्र होती की, स्थानिक लोक आणि प्रत्यक्षदर्शी हतबल झाले होते. प्रत्यक्षदर्शी पुढे म्हणाले की, आम्ही आत अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, पण आगीच्या ज्वाळा आणि सतत होणारे स्फोट यामुळे कोणालाही विमानाच्या जवळ जाणे शक्य झाले नाही. त्यातच आम्हाला कळलं की या विमानात खुद्द अजित दादा आहेत... हे सांगतानाही आम्हाला शब्द सुचत नाहीत. वैमानिकाने लँडिगचा प्रयत्न केला असेल पण ते झालं नाही. धावपट्टीवर उतरेल असं वाटत असतानाच जवळपास १०० फुटांवरुन ते कोसळले.

## महाराष्ट्र 'दादा'ला उद्या अखेरचा निरोप देणार!



### बारामतीत होणार अजित पवारांवर अंत्यसंस्कार;

### पंतप्रधान मोदी आणि अमित शहा उपस्थित राहणार

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८बारामती–** विमान अपघातात दुर्दैवी निधन झालेले महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर उद्या (२९ जानेवारी २०२६) त्यांच्या कर्मभूमीत म्हणजेच बारामती येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. या दुःखद प्रसंगी उपस्थित राहण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या बारामतीत येणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

अजित पवार यांचे पार्थिव आज संध्याकाळपर्यंत बारामतीत अंतिम दर्शनासाठी ठेवले जाण्याची शक्यता आहे. उद्या सकाळी १० वाजेच्या सुमारास त्यांची अंत्ययात्रा निघणार असून, त्यानंतर बारामतीतील मिशन हायस्कूल मैदानावर किंवा पवार कुटुंबाच्या शेतावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील. राज्य सरकारने राजकीय शोक जाहीर केला असून, अंत्यसंस्कारावेळी त्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देऊन मानवंदना दिली जाईल.

पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांची उपस्थिती बोल्ड करणे

अजित पवार यांचे केंद्र सरकार आणि भाजप नेत्यांशी असलेले जवळचे संबंध सर्वश्रुत होते. त्यांच्या निधनामुळे पंतप्रधान मोदींनी दुःख व्यक्त केले असून, उद्या ते स्वतः बारामतीत येऊन पार्थिवाचे दर्शन घेणार आहेत. त्यांच्यासोबत गृहमंत्री अमित शहा आणि देशातील इतर महत्त्वाचे नेतेही उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर बारामती शहरात कडेकोट सुरक्षा व्यवस्था आणि 'नो फ्लाय झोन' लागू करण्यात आला आहे.बारामतीमधील सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आले असून, शहरात अत्यंत शोकाकुल वातावरण आहे.

## कुणावरही विश्वास नाही, सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली अजित पवारांच्या मृत्यूची चौकशी व्हावी; ममतांनी उपस्थित केला सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८बंगलेरू–** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी सकाळी बारामतीमध्ये एका भीषण विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या मृत्यूने राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे. दरम्यान, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या अपघातामागे कटाची शक्यता वर्तवत सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशीची मागणी केली आहे.

ममता बॅनर्जी यांनी या घटनेवर शोक व्यक्त करत राजकीय नेत्यांच्या सुरक्षेवर प्रश्न उपस्थित केला आहे. अजित पवार भाजप सोडण्याच्या आणि महायुतीपासून दूर जाण्याच्या



विचारात होते, अशा चर्चा सोशल मीडियावर होत्या. त्यामुळे या अपघाताची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. आपला केवळ सुप्रीम कोर्टावरच विश्वास आहे. इतर तपास यंत्रणांवर नाही, असे ममतांनी म्हटले आहे.तत्पूर्वी, ममता यांनी 'एक्स'वर, अजित पवार यांच्या अकस्मात निधनाने धक्का बसला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि त्यांच्या इतर लोकांचा आज सकाळी विमान अपघातात बारामती येथे मृत्यू झाला. यामुळे अत्यंत दुःखी आहे. त्यांचे काका शरद पवार यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांना आणि दिवंगत अजित पवार यांच्या सर्व मित्रांना आणि समर्थकांसोबत माझ्या संवेदना, अशी पोस्ट केली होती.

## अजित पवारांना घड्याळानेच दिली शेवटची ओळख

### विमानातील कागदपत्रे सहिसलामत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८बारामती–** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि धडाडीचे नेते म्हणून ओळख असणारे अजित पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. बुधवारी सकाळी बारामतीत झालेल्या या भीषण दुर्घटनेत अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विदीप जाधव, पिंकी माळी, कॅप्टन सुमित कपूर आणि कॅप्टन शांभवी पाठक यांचा मृत्यू झाला. सर्व मृतदेह अत्यंत जळालेल्या अवस्थेत आढळून आले. अजित पवार यांच्या मृतदेहाची



ओळख त्यांच्या मनगटावरील घड्याळामुळे पटली. राजकीय जीवनात 'घड्याळ' हेच चिन्ह घेऊन अजित पवारांचा संपूर्ण प्रवास झाला आणि त्याच घड्याळाने त्यांच्या आयुष्याची शेवटची ओळख पटवणे, हा नियतीचा अत्यंत क्रूर खेळ असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.अपघात ज्या ठिकाणी झाला तो भाग खोलगट असून आजूबाजूला झाडझुडपं, उसाची शेती आणि काही घरांची वस्ती आहे. विमान थेट उतारावरील जमिनीवर आदळल्यामुळे त्याला प्रचंड धक्का बसला.

संपूर्ण विमान जळून कोळसा झाले. मात्र या भीषणतेतही आश्चर्याची बाब म्हणजे विमानातील काही कागदपत्रे सहिसलामत आढळून आली. अंदाज व्यक्त केला जात आहे की, विमान कोसळल्यानंतर दोन तुकड्यांमध्ये विभागले गेले असावेत आणि त्यामुळे कागदपत्रे बाहेर फेकली गेली असावीत.

## संपादकीय ......

# दावोसचा संदेश

*महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दावोसला गेलेत. तेथे ते जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीस हजर राहणार. मुख्यमंत्री फडणवीस यांनी १६ लाख कोटींचे करार करण्याचे उद्दिष्ट ठेवले. सरकारने फडणवीस यांच्या नेतृत्वाचा उपयोग देशात गुंतवणूक आणण्यासाठी करण्याचा प्रयत्न केला आहे.*

*गेल्या वर्षी मुख्यमंत्री दावोसला उपस्थित राहिले होते तेव्हा आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली होती, की ही गुंतवणूक देशी कंपन्यांचीच आहे. केवळ ११ कंपन्या परदेशी आहेत. पण या राजकीय आरोप-प्रत्यारोपांना बाजूला ठेवले तरीही एक बाब लक्षात येते ती ही, की मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रचंड गुंतवणूक आणली आहे आणि त्याचा उपयोग भारतातील बेरोजगारी दूर हटवण्यासाठी करण्यात येईल. गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे एमओयू करण्यात आले होते. त्यापैकी प्रत्यक्षात ७२ टक्के अमलात आले आहेत. यंदाही मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुंतवणूक आणण्यावर भर राहणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. यंदा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेही जागतिक आर्थिक मंचाचे आकर्षण असणार आहेत. कारण त्यांच्यासमवेत शिष्टमंडळ हे सर्वात मोठे असेल असे सांगण्यात येते. पण ट्रम्प यांनी अनेक देशांना टॅरिफ लावून जेरीस आणले आहे आणि त्यामुळे त्यांच्या वाटाघाटीत काय होते हे महत्त्वाचे आहे. पण विषय आपला महाराष्ट्राचा चालला आहे, तर फडणवीस सांगतात की यंदा गतवर्षीपेक्षाही जास्त गुंतवणूक आणणार आहे ते विशेष महत्त्वाचे आहे. मुळात दावोस गुंतवणूक ही जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम करते. जिथे देश आणि राज्ये, जसे की महाराष्ट्र किंवा मध्य प्रदेश राज्यातून जागतिक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रचंड प्रयत्न होतात. त्यामुळे रोजगार निर्मिती, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि शाश्वत विकासाला चालना मिळते. भू-राजकीय तणाव आणि आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत हे एक प्रमुख गुंतवणूक ठिकाण म्हणून उदयास येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी सांगतात, की भारत हे गुतवणूकदारांचे अत्यंत आकर्षक आणि विश्वासाचे ठिकाण म्हणून सध्या उदयाला आले आहे. त्याचाच परिणाम म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा दावोस दौरा आहे.*

*कॅनडा आणि मेक्सिकोपाठोपाठ अमेरिकेने भारतावरही टॅरिफ लावण्याचा आणि तोही भरमसाट टॅरिफ लावण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याला विशेष महत्त्व आहे. कारण मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोस येथून जी गुंतवणूक आणतील त्यातून येथे रोजगार निर्माण होतील आणि त्याचा परिणाम येथील तरुणांना रोजगारांचा लाभ देण्यात होईल. त्याचबरोबर महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे आणि त्याचे पडसाद राज्याच्या औद्योगिक वाटचालीत दिसून येतात. मुख्यमंत्र्यांचा दावोस दौरा हे त्याचेच फल आहे. मुख्यमंत्र्यांच्या या दावोस दौऱ्याने स्टील म्हणजे पोलाद, केमिकल्स आणि सिमेंट बॅटरी या उद्योगात मोठी गुंतवणूक होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याच काळात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर आला आणि त्याचे एकमेव कारण होते ते औद्योगिक गुंतवणूक. राज्याची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर्सवर नेण्यासाठी राज्यात प्रचंड गुंतवणूक येण्याची गरज आहे आणि ती मुख्यमंत्री फडणवीसच आणू शकतात, असा विश्वास सर्वांनाच आहे. गेल्या काही वर्षांत भारतातील काही औद्यागिक राज्यांच्या सरकारांनी उदा. महाराष्ट्र, आसाम यांनी उच्चाधिकार शिष्टमंडळे दावोसला पाठवली आहेत. त्यात संबंधित राज्यांचे मुख्यमंत्रीही आहेत आणि हाच पॅटर्न यंदाही अमलात आणला आहे. ज्या क्षेत्रात गुंतवणूक केली जाणार आहे, ती क्षेत्रे आहेत स्वच्छ ऊर्जा, सागरी अन्नाची निर्यात आणि तत्सम क्षेत्रे. स्विस कंपन्यांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्यात मुख्यमंत्री यशस्वी होतील यात काही शंका नाही.*

*महाराष्ट्राची स्पर्धा ही आसाम आणि मध्य प्रदेश या अन्य राज्यांशी असली तरीही त्यात विखार नाही. केवळ आपल्या राज्यासाठी जास्तीत जास्त गुंतवणूक आणणे आणि आपल्या लोकांना चांगल्यातील चांगले जीवन बहाल करणे हेच उद्दिष्ट आहे. कारण शेवटी राज्यकर्त्यांचे उद्दिष्ट तर आपल्या जनतेचे कल्याण करणे हेच असते. यंदा दावोस येथील भारताचे प्रतिनिधित्व भारतातील महाराष्ट्राचे फडणवीस तसेच आणि तेलंगणाचे रेवंथ रेड्डीशिवाय आसामचे विस्वकर्मा आणि झारखंडचे हेमंत सोरेन करतील. प्रत्येक राज्य त्याच्या गरजेच्या दृष्टीने औद्योगिक गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न करणार आहे. पण सर्वात महत्त्व आहे ते केवळ महाराष्ट्रालाच. कारण हे राज्य प्रगत आहे आणि गेल्या वर्षी त्याने विक्रमी गुंतवणूक आणली आहे. आणखी एक विशेष, की ट्रम्प यांच्या कारकिर्दीला एक वर्ष पूर्ण होत आहे. अशावेळी ते जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत सहभागी होत आहेत, हे निश्चित आहे, की ट्रम्प यांनी टॅरिफचा वापर शस्त्र म्हणून अनेक देशांविरुद्ध केला आहे आणि त्यात भारतही आला. केवळ देशांतर्गत उत्पादकांना संरक्षण देण्यासाठी त्यांनी हे प्रचंड टॅरिफचे शस्त्र उगारले. यात त्यांचा राजकीय उद्देष्यही आहे. जास्तीत जास्त रोजगार अमेरिकन लोकांनाच मिळावा हा त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. वाढती जागतिक गुंतागुंत आणि भू-राजकीय तुकडे करणाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक स्पर्धात्मकता यांच्या परिप्रेक्ष्यात जागतिक आर्थिक मंच जागतिक नेत्यांना भारतातील राजकीय नेत्यांना इमपार्शल म्हणजे तटस्थ मंच उपलब्ध करून देईल अशी आशा वाटते. मुख्यमंत्री फडणवीस यांची आणखी एक परीक्षा आहे आणि त्यात ते कितपत यशस्वी होतात हे काळच दाखवेल. पण त्यांचे कर्तृत्व पाहता ते यातही यशस्वी होतील यात काही शंका नाही. ट्रम्प यांच्या एकांगीवादाला फडणवीस यांचे यश हेच उत्तर आहे. जागतिक आर्थिक मंचाची बैठक ही जग कोणत्या दिशेने जात आहे याविषयी अधिक आहे. सामान्य गुंतवणुकीसाठी जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीतील निर्णय हे परिणामकारक नसतात पण ते खरे असतात आणि त्यातून जे धोरणात्मक संदेश दिले जातात त्यांच्यासाठी ते वास्तविक असतात.*

---

पहाटेचा राजा, शिस्त, वचक, ७ वेळा उपमुख्यमंत्री अन् ४० वर्षांचा दरारा...

# राजकारणातील धगधगतं वादळ ‘अजितदादा’ काळाच्या पडद्याआड!

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील आजचा दिवस एका काळ्या अध्यायाप्रमाणे उजाडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे दिग्गज नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे झालेल्या भीषण विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले आहे. लँडिंगच्या प्रक्रियेदरम्यान विमान कोसळून झालेल्या या दुर्घटनेत अजित पवारांसह विमानातील सहाही प्रवाशांनी आपले प्राण गमावले आहेत. विमान धावपट्टीवर उतरत असताना (डरपवळपस) अचानक तांत्रिक बिघाड झाला आणि विमानाचे नियंत्रण सुटले. पाहता पाहता विमान जमिनीवर आदळले आणि त्याला भीषण आग लागली. हा अपघात इतका भयानक होता की, विमानाचा अक्षरशः चक्काचूर झाला असून परिसरात धुराचे काळे लोट पसरले होते. या दुर्घटनेत अजित पवारांसोबत त्यांचे सहकारी आणि क्रू मेंबर्स अशा एकूण ६ जणांचा मृत्यू झाला आहे. 'दादा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजित पवारांच्या निधनामुळे राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असून, राज्य सरकारने सर्व नियोजित कार्यक्रम रद्द केले आहेत. प्रशासनाकडून या अपघाताच्या चौकशीचे आदेश देण्यात आले असून, संपूर्ण महाराष्ट्र सध्या सुन्न अवस्थेत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगते पर्व आज कायमचे शांत झाले आहे. २२ जुलै १९५९ रोजी जन्मलेले अजित पवार केवळ एक नेते नव्हते, तर ते गतीमान प्रशासनाचे प्रतीक होते. १९८२ मध्ये स्थानिक राजकारणातून सुरू झालेला त्यांचा प्रवास राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाच्या विक्रमी कारकिर्दीपर्यंत पोहोचला. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राने एक असा नेता गमावला आहे, ज्याचा प्रशासनावर प्रचंड वचक आणि शब्दाला मोठी किंमत होती. १९८२ मध्ये सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावरून त्यांनी सक्रिय राजकारणात पाऊल ठेवले. १९९१ मध्ये ते पहिल्यांदा बारामतीतून खासदार म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी सलग आठ वेळा विधानसभेत बारामतीचे प्रतिनिधित्व केले. जलसंपदा, अर्थ आणि नियोजन यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळताना त्यांनी आपल्या कामाची वेगळी



छाप पाडली. कामात स्पष्ट वक्तेपणा आणि वेळेचे पालन ही त्यांची प्रमुख ओळख होती. महाराष्ट्राच्या इतिहासात सहा वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याचा ऐतिहासिक विक्रम त्यांच्या नावावर आहे. पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे अशा विविध मुख्यमंत्र्यांसोबत त्यांनी हे पद भूषवले. काका शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढवण्यात अजित पवारांचा मोलाचा वाटा होता.

## असा घडला अजित पवारांचा प्रभावशाली राजकीय प्रवास!

महाराष्ट्राच्या राजकारणात 'दादा' या नावाने परिचित असलेल्या अजित पवार यांनी आपल्या कारकिर्दीत सत्ता आणि संघटन या दोन्ही आघाड्यांवर आपली मोहोर उमटवली. १९९३ मध्ये शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये मिळालेल्या संधीपासून सुरू झालेला हा प्रवास राज्याच्या सर्वोच्च पदांपैकी एक असलेल्या उपमुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचला. केवळ राजकारणच नव्हे, तर ग्रामीण महाराष्ट्राची अर्थवाहिनी असलेल्या सहकार क्षेत्रावरही त्यांची मजबूत पकड होती. १९९३ साली जेव्हा शरद पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद स्वीकारले, तेव्हा अजित पवार यांच्याकडे मंत्रिमंडळातील महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली. या संधीचे सोने करत त्यांनी प्रशासनावर आपली पकड निर्माण केली. २०१० मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या काळात उपमुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यानंतर त्यांचा राजकीय लौकिक अधिक उंचावला. या काळात राज्याच्या धोरणात्मक निर्णयात त्यांचा शब्द प्रमाण मानला जात असे. अजित पवार यांची ओळख केवळ एक राजकारणी म्हणून मर्यादित नव्हती. महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांनी मोलाचे योगदान दिले. राज्यातील अनेक सहकारी साखर कारखान्यांच्या जडणघडणीत आणि व्यवस्थापनात त्यांचा सक्रिय सहभाग होता. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे (झऊउउ) अध्यक्ष म्हणून काम पाहताना त्यांनी शेतकरी आणि सभासदांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. सहकार क्षेत्रातील शिस्त आणि पारदर्शकता ही त्यांच्या कामाची मुख्य वैशिष्ट्ये राहिली. राजकारण असो वा सहकार, अजित पवार यांनी प्रत्येक ठिकाणी आपल्या स्पष्टवक्तेपणाची आणि कामाच्या झपाट्याची छाप पाडली. त्यांच्या जाण्याने सहकार चळवळीचे मोठे नुकसान झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

## जुलै २०२३ पुन्हा सांभाळली उपमुख्यमंत्रीपदाची धुरा

जुलै २०२३ मध्ये त्यांनी पुन्हा एकदा राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळली आणि सत्तेच्या केंद्रस्थानी राहून प्रशासनावर आपली पकड किती मजबूत आहे, हे पुन्हा एकदा दाखवून दिले होते. राज्याच्या राजकारणात जुलै २०२३ मध्ये झालेल्या मोठ्या उलथापालथीनंतर त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. या भूमिकेत त्यांनी राज्याच्या विकासकामांना गती देण्याचे काम केले. मंत्रालयातील फाईल्सचा निपटारा असो किंवा जिल्हा पातळीवरील आढावा बैठका, अजित पवारांच्या कामाची पद्धत नेहमीच 'रिझल्ट ओरिएंटेड' राहिली. ४० वर्षांहून अधिक काळाचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या पाठीशी असल्याने ते कोणत्याही गुंतागुंतीच्या प्रश्नावर झटपट मार्ग काढत असत. सत्तेत असताना सामान्यांची कामे वेळेत पूर्ण करण्यावर त्यांचा नेहमीच भर असे. त्यांच्या अशा अचानक जाण्याने महाराष्ट्राने एक मजबूत प्रशासक आणि अनुभवी मार्गदर्शक गमावला आहे, अशी भावना सध्या राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

---

# अजित पवारांचं मुख्यमंत्री होण्याचं स्वप्न अपूर्णच!


**'६' क्रमांक अन् अपघाताचा दुर्दैवी योगायोग चर्चेत**

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८बारामती**

कधी उशीरा, कधी लवकर हा आपआपल्या नशीबाचा भाग असतो. आपण काम करत राहायचं? त्याचं फळ आपल्याला मिळतं, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री पदाबाबत केलेलं हे वक्तव्य आजही अनेकांना आठवतयं. अजित पवार यांनी आजवर तब्बल सहा वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रिपद भूषवलं. मात्र मुख्यमंत्री होण्याचं अजित पवार यांचं स्वप्न अपूर्ण राहिलं.

विधानसभा निवडणुकीच्या एका माध्यमाला दिलेल्या मुलाखतीत अजित पवार म्हणाले होते, माझा उपमुख्यमंत्री पदाचा रेकॉर्ड आहे. पण गाडी तिथंच




अडकली आहे. पुढं जातच नाही तर काय करू. मुख्यमंत्री होण्याची इच्छा अजित पवारांनी अनेकदा बोलून दाखवली होती. पण आता अजित पवारांचं हे स्वप्न आता कधीच पूर्ण होणार नाही. त्यांच्या राजकीय वाटचालीचा आढावा घेताना २००४ च्या विधानसभा निवडणुकीचा संदर्भ अपरिहार्यपणे पुढं येतो. त्या वेळी अजित पवार मुख्यमंत्री झाले असते का? हा प्रश्न आजही राजकीय वर्तुळात चर्चिला जातो.

### ६ क्रमांक अन् अजित पवार :

राज्याचे अर्थमंत्री म्हणून अजित पवारांनी खर्चाचा मेळ बसवलेला होता. दादा हिशोबात एकदम पक्के होते. राज्यावर कितीचे कर्ज आहे? किती उत्पन्न आहे? वित्तीय तूट किती? या सह सर्व हिशोबाचे आकडे तोंडपाठ असलेल्या अजित पवारांच्या नशिबी मृत्यूनंतरदेखील या आकड्यांनी पाठ सोडलेली नाही. ज्यावेळी अजित पवार याचे निधन झालं त्यावेळी त्यांचे वय ६६ वर्ष ६ महिने आणि ६ दिवस इतके होते. अजित पवार यांचा जन्म २२ जुलै १९५० रोजी झाला. त्याच हिशोबानं अजित पवारांचं वय ६६ वर्ष आहे. जुलै महिन्यात वाढदिवस असल्यानं जानेवारीत त्यांना ६६ वर्ष ६ महिने पूर्ण झालेत. तर २२ जुलै हा त्याचा जन्मदिवस आहे. या आकडेवारीनुसार २८ जानेवारीला अजित पवार यांचं वय ६६ वर्ष ६ महिने आणि ६ दिवस इतकं होतं. योगायोग म्हणजे अजित पवारांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत ६ वेळा विविध सरकारमध्ये उपमुख्यमंत्री पद भूषवलं आहे.

---

# अजितदादांच्या आईला कळू नये म्हणून टीव्हीची केबल तोडली:लेकाला भेटायला चालतच निघाल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८बारामती** – राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मुंबईहून बारामतीकडे येत असताना विमानतळाजवळ झालेल्या भीषण अपघातात दुःखद निधन झाले असून, या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे. त्यातच आता अजित पवारांच्या फार्म हाऊसवरून मनाला चटका लावणारी माहिती समोर आली आहे. दादांच्या फार्म हाऊसवरील व्यवस्थापक संपत धायगुडे यांनी अजित पवारांच्या आई संदर्भात माहिती दिली आहे.

संपत धायगुडे यांनी सांगितले की, सकाळी सात वाजता नेहमीप्रमाणे अजितदादांच्या आई फार्म हाऊसवरती टीव्ही पाहत होत्या. त्यांना नाश्ता देण्याची तयारी करत होतो. त्यानंतर सकाळी साडेआठ वाजता अजितदादांच्या विमान अपघाताची बातमी टीव्हीवर येत होती.




आईंनी लगेच आम्हाला विचारले 'अरे दादांचा अपघात झालाय का?' पण आईलाही वाटले त्यांना खरचटले असेल काही झाले नसेल.

### फार्महाऊसच्या बाहेर चालतच निघाल्या..

पुढे संपत धायगुडे सांगतात की, बारामतीत हॉस्पिटलमध्ये दादांना आणल्याची टीव्हीवरून बातमी आली. त्यावेळी आम्ही लगेच आईला पुढच्या बातम्या कळू नयेत, यासाठी बंगल्यावरील टीव्हीची केबल तोडली आणि टीव्ही बंद पडल्याचे सांगितले. त्यांचा मोबाईलही फ्लाईट मोडवर टाकून दिला.


काही झाले नसल्याचे आम्ही त्यांना सांगत होतो. पण दादांना भेटून येऊ चला असे म्हणून त्या फार्महाऊसच्या बाहेर चालतच निघाल्या होत्या. ड्रायव्हरने गाडी बंद पडल्याचेही सांगितले. पण त्या ऐकल्या नाहीत. शेवटी नाईलाजाने त्यांना आम्ही बारामती येथील बंगल्यावर घेऊन गेलो, अशी माहिती संपत धायगुडे यांनी दिली आहे.

---



प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या ट्वीटमधील शोकसंदेशात लिहिले कीश्री अजित पवार जी हे जनतेचे नेते होते, ज्यांचा जमिनीवरील पातळीवर मजबूत जनसंपर्क होता.महाराष्ट्रातील लोकांची सेवा करण्यासाठी सदैव अग्रभागी असणारे कष्टाळू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना मोठा मान दिला जात होता.प्रशासनिक विषयांवरील त्यांची सखोल समज आणि गरीब व वंचितांना सक्षम करण्याची त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय होती.त्यांचे अचानक निधन अत्यंत धक्कादायक आणि दुःखद आहे. त्यांच्या कुटुंबीयांप्रती आणि असंख्य चाहत्यांप्रती माझ्या मनःपूर्वक संवेदना.

---



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार जी यांच्या अपघाती निधनाचे वृत्त अतिशय धक्कादायक, दुर्दैवी आणि दुःखद आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. गेली अनेक वर्ष राज्याच्या विधिमंडळात सोबत काम करताना अजितदादांशी अतिशय जवळचा संबंध राहिला आहे. त्यांचे प्रशासनिक कौशल्य, विकासात्मक दृष्टिकोन आणि लोकांना जोडण्याची हातोटी यांमुळे अजितदादांचे कायमच महाराष्ट्राच्या राजकारणात एक अढळ स्थान राहिले आहे. महाराष्ट्राच्या विकासाची आकांक्षा असलेल्या या लोकनेत्याचे अकाली निधन होणे, ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर संपूर्ण देशाची कधीही भरून न निघणारी हानी आहे. या दुःखद प्रसंगी संपूर्ण पवार कुटुंबीयांसोबत माझ्या संवेदना आहेत. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती प्रदान करो. शांती.

---

## माझा मोठा भाऊ हरपला' – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



पासपोर्ट ३९

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या बातमीवर बोलतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्या मनात माझा मोठा भाऊ हरपला अशी भावना आहे, अशा शब्दांमध्ये त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. अजित पवार यांच्या विमानाला आज बुधवार २८ जानेवारी रोजी बारामती येथे मोठा अपघात झाला. या अपघातात अजित पवार यांचा मृत्यू झाला असून त्यांच्यासह अजून सहा जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात अजित पवार यांचं विमान जळून खाक झालं.

### काय म्हणाले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ?

मनाला चटका आणि वेदना देणारी ही घटना आहे. अजितदादा आपल्याला इतक्या लवकर सोडून जातील असा विचारही कोणी केला नसेल. दादा गेली अनेक वर्षे महाराष्ट्राचे नेतृत्त्व करत होते. अतिशय परखड व्यक्तिमत्व होतं त्यांचं. चूक त्याला चूक म्हणणारे ते असले तरी ते मनाने अतिशय निर्मळ होते, याचा अनुभव मी घेतला आहे. मी त्यांच्यासोबत अनेक वर्षे काम केलं आहे. अजितदादा यांना काम करताना वेळेच भान नसायचं. सकाळी ६ वाजता देखील ते लोकांना भेटायचे. परवाच आमची एका कार्यक्रमात भेट झाली होती. वयाने आणि अनुभवाने ते माझ्यापेक्षा मोठे होते, त्यामुळेच मला माझा मोठा भाऊ हरपला असं वाटत आहे.

---

## ते महाराष्ट्राच्या विकासाचा चेहरा; आमदार अर्जुन खोतकर



अजित पवार म्हणजे केवळ एक राजकारणी नव्हते, तर महाराष्ट्राच्या विकासाचा चेहरा होते. त्यांनी आयुष्यभर विकासासाठी काम केलं. ते कधीही केवळ राजकारणासाठी राजकारण करणारे नेते नव्हते. राज्याच्या सिंचन, कृषी, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण विकासासाठी अजित पवार यांनी दिलेलं योगदान अविस्मरणीय आहे. राज्याला दिशा देणारा एक खंबीर नेता आपण गमावला आहे. ही केवळ एका पक्षाची नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राची मोठी हानी आहे. या घटनेमुळं जालना जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे, अशा शब्दांत आमदार अर्जुन खोतकरांनी भावना व्यक्त केली.

---

## कामाप्रती समर्पित असलेला नेता; इम्तियाज जलील



काम करणारा नेता महाराष्ट्रानं नाही तर देशानं गमावला. निर्णय घेण्याची क्षमता असलेला नेता म्हणून त्यांची ओळख होती. कामाप्रती समर्पित असलेला नेता म्हणून त्यांची ओळख सर्वत्र होती. पवार परिवाराच्या भावना आता आपण समजू शकत नाही. मात्र देव त्यांना या संकटातून सावरण्याची ताकद देऊ, अशी भावना इम्तियाज जलील यांनी व्यक्त केली.

---

## महाराष्ट्राच्या विकासात त्यांचं अमूल्य योगदान; आमदार संजय गायकवाड :



अजित दादांच्या निधनाच्या बातमीनं मी पूर्णपणे भाऊक झालो आहे. महाराष्ट्राच्या विकासात त्यांचं अमूल्य योगदान होतं. ते 'दादा' म्हणून सर्वांमध्ये प्रिय होते. आज महाराष्ट्रानं एक मोठा आधार गमावला आहे. अजित पवार यांना महाराष्ट्राच्या राजकारणातील 'बेताज बादशाह' म्हणून ओळखलं जायचं. शरद पवारांच्या छायेतून बाहेर पडून त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली. बारामती हा त्यांचा गड होता आणि राज्याच्या राजकारणात त्यांचा दबदबा कायम राहिला. या अपघातानं संपूर्ण राज्य शोकाकुल झालं आहे. महाराष्ट्र सरकार, राजकीय नेते आणि जनतेकडून श्रद्धांजली व्यक्त होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देऊ दे आणि कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, अशी भावना आमदार संजय गायकवाड यांनी दिली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २८ जानेवारी २०२६

शहर/ग्रामिण

# ‘विमानात कोणताही बिघाड नव्हता’

## अजित पवारांच्या विमान अपघातावर कंपनीच्या मालकाचे स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८बारामती–** राष्ट्रवादी काँग्रेस(अप) पक्षाचे प्रमुख आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज(दि.२८) सकाळी बारामती येथे विमानअपघातात दुःखद निधन झाले. बारामतीविमानतळावर लँडिंगदरम्यान हा भीषण अपघात झाला. यात अजितदादांसह, विमानातील सर्व पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, या दुर्दैवी घटनेनंतर संबंधित विमान कंपनीच्या मालकाची महत्वाची प्रतिक्रिया समोर आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त विमान व्हीएसआर व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे होते. अपघातानंतर दिल्लीमध्ये मीडियाशी संवाद साधताना कंपनीचे संचालक विजय कुमार सिंह यांनी सांगितले की, ’विमान उतरवण्याचा निर्णय पूर्णतः वैमानिकाचा होता. त्यांनी आधी रनवे २९ वर विमान उतरवण्याचा प्रयत्न केला, मात्र काही तांत्रिक अडचण आली. त्यानंतर रनवे ११ वर पुन्हा लँडिंगचा प्रयत्न केला आणि त्याचवेळी हा दुर्दैवी अपघात घडला.’

विमान पूर्णपणे व्यवस्थित; कोणताही तांत्रिक दोष नव्हता

विजय कुमार सिंह स्पष्टपणे म्हणाले, ’विमानाची देखभाल अत्यंत चांगल्या पद्धतीने करण्यात आली होती. आमच्या माहितीनुसार विमानात कोणताही तांत्रिक बिघाड नव्हता. कोणतीही यांत्रिक अडचण आढळलेली नाही.

दृश्यता कमी, रनवे न दिसणे हे प्राथमिक कारण?

ते पुढे म्हणाले, ’प्राथमिकदृष्ट्या असे दिसते की, वैमानिकाला रनवे स्पष्टपणे दिसत नव्हता. दृश्यता कमी होती. आम्ही सध्या मृतांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहण्याचा प्रयत्न करत आहोत. ही आमच्यासाठी खूप मोठी शोकांतिका आहे.’ २०२३ मध्ये झालेल्या अपघाताबाबत बोलताना ते म्हणाले, ’तो अपघात मुंबई विमानतळावर झाला होता. त्यावेळीही पाऊस होता आणि दृश्यता कमी होती. लँडिंगनंतर विमान रनवेवरून घसरले होते. ती वेगळी घटना होती.’

### वैमानिक अत्यंत अनुभवी होते

विमानाच्या क्रूबाबत माहिती देताना विजय कुमार सिंह म्हणाले, ’कॅप्टन सुमित कपूर यांना १६ हजारांहून अधिक तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. को-पायलटकडेही सुमारे १५०० तासांचा अनुभव होता. कॅप्टन कपूर यांनी यापूर्वी सहारा एअरलाइन, जेटलाईट आणि जेट एअरवेज सारख्या नामांकित विमान कंपन्यांमध्ये काम केले होते. ते या प्रकारच्या विमानावरही अत्यंत अनुभवी होते.’

### ते माझ्या कुटुंबासारखे होते

’कॅप्टन सुमित कपूर माझे खूप चांगले मित्र होते; ते मला भावासारखे होते. त्यांचा मुलगाही आमच्याच कंपनीत पायलट आहे. कॅप्टन शांभवी पाठक माझ्यासाठी मुलीसारख्या होत्या. दोघेही उत्कृष्ट वैमानिक आणि अत्यंत चांगले माणसे होती,’ अशी प्रतिक्रिया विजय कुमार सिंह यांनी दिली. दरम्यान, या अपघाताबाबत नागरी विमान वाहतूक यंत्रणांकडून चौकशी सुरू असून, ब्लॅक बॉक्स व तांत्रिक तपासणीनंतरच अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

# अजित पवारांच्या निधनाने मराठी कलाविश्वात शोककळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८मुंबई**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि सर्वात धडाडीचे नेते म्हणून प्रचलित असलेले आणि पहाटचे दिवसाची सुरुवात करून अवघ्या महाराष्ट्राला आदर्श घालून देणारे महाराष्ट्राचे दादा व्यक्तिमत्व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आहे. आज बुधवारी, २८ जानेवारी २०२६ ला बारामतीमध्ये झालेल्या विमान अपघातात दादांनी अकाली एक्झिट घेतली आहे. बारामती दौऱ्यासाठी निघालेल्या अजित पवार यांच्या विमानाचे लँडिंग होताना भीषण अपघात झाला. अपघातानंतर विमानाचे अक्षरशः तुकडे झाले होते. विमानाची स्थिती पाहूनच कोणीही वाचू शकणार नाही असे दिसून येत होते. अपघातग्रस्त विमान पाहिल्यानंतर आणि त्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर अनेकांना अश्रू अनावर झाले.

अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण मराठी कलाविश्वात शोककळा पसरली आहे. या दुःखद घटनेनंतर अनेक नामवंत मराठी कलाकारांनी सोशल मीडियावर भावुक पोस्ट शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

## कलाकारांकडून हळहळ व्यक्त




### ‘ते नेहमी स्पष्ट, ठाम आणि निर्भीड’– रितेश देशमुख

अभिनेता रितेश देशमुखने अजित पवार यांच्या निधनावर तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. त्याने सोशल मीडियावर एक भावुक पोस्ट शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या पोस्टमध्ये रितेशने म्हटलं आहे की, अजित पवार यांच्या अपघाती निधनाची बातमी अत्यंत धक्कादायक आहे. या घटनेमुळे मनाला खूप वेदना झाल्या आहेत. अजित पवार हे महाराष्ट्रातील एक कर्तृत्ववान, प्रभावी आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व होते. कामाबाबत ते अत्यंत काटेकोर होते आणि प्रत्येकाकडून सर्वोत्तम काम करून घेण्यावर त्यांचा भर असायचा. पुढे रितेश म्हणाला, ते नेहमी स्पष्ट, ठाम आणि निर्भीड मत मांडत होते. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचा मोठा जनसंपर्क होता. त्यांच्या अकाली जाण्यामुळे राज्याने एक मजबूत नेतृत्व गमावलं असून ही हानी कधीही भरून न येणारी आहे. मला त्यांच्याशी अनेक वेळा संवाद साधण्याची संधी मिळाली होती. त्यांची आपुलकी, साधेपणा आणि माणुसकी कायम स्मरणात राहील. शेवटी रितेशने, पवार कुटुंबीय, नातेवाईक आणि त्यांच्या असंख्य समर्थकांच्या दुःखात मी मनापासून सहभागी आहे. अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली, अशा शब्दांत संवेदना व्यक्त केल्या.

### ‘ही गोष्ट स्वीकारणं अत्यंत कठीण’– सायली संजीव

अजित पवार यांच्या निधनाने अनेक मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. अभिनेत्री सायली संजीवने सोशल मीडियावर भावुक प्रतिक्रिया देत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. तिने म्हटलं आहे की, ही गोष्ट स्वीकारणं अत्यंत कठीण आहे. अजित दादांशिवाय महाराष्ट्राचं राजकारण अपूर्ण वाटत आहे. भावपूर्ण श्रद्धांजली.

### ‘महाराष्ट्राचं राजकारण तुमच्याशिवाय अपूर्ण’– जोग

अजित पवार यांच्या निधनावर पुष्कर जोगनेही तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. सोशल मीडियावर शेअर केलेल्या भावुक पोस्टमध्ये त्याने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. पुष्करने लिहिलं आहे की, महाराष्ट्राचं राजकारण तुमच्याशिवाय अपूर्ण वाटत आहे. राज्याच्या विकासासाठी तुमची अत्यंत गरज होती. तुमचा मिश्किल पण स्पष्ट आणि थेट स्वभाव यामुळे तुम्ही सर्वांचेच लाडके होता. एक कर्तृत्ववान आणि सक्षम नेता आपण गमावला आहे. ही घटना अत्यंत धक्कादायक आहे. अजित दादा, भावपूर्ण श्रद्धांजली. महाराष्ट्राने आज एक मोठं नेतृत्व गमावलं आहे.

### ‘अजूनही विश्वास बसत नाही’– सलील कुलकर्णी

याशिवाय प्रसिद्ध गायक आणि संगीतकार सलील कुलकर्णी यांनीही शोक व्यक्त करत, अजूनही विश्वास बसत नाही अजित दादा, अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

### ‘ही बातमी अत्यंत अस्वस्थ करणारी’– कपिल होनराव

दरम्यान, कपिल होनराव यांनीही या दुःखद घटनेवर प्रतिक्रिया देत, ही बातमी अत्यंत अस्वस्थ करणारी आणि मनाला हादरवणारी आहे, असं म्हणत अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. तसंच गायिका बेला शेंडे, आर्या आंबेकर यांच्यासह अभिनेत्री हेमांगी कवी, नम्रता संभेराव, तेजश्री प्रधान, विशाखा सुभेदार, शुभांगी गोखले यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. याशिवाय अभिनेता प्रथमेश परब, सुमित पुसावळे, प्रसाद खांडेकर, स्वप्नील जोशी यांच्यासह अभिनेत्री अमृता खानविलकर आणि सोनाली कुलकर्णी यांनीही शोक व्यक्त केला आहे. या कलाकारांच्या पोस्टमधून अजित पवार यांच्याबद्दलचा आदर, प्रेम आणि दुःख स्पष्टपणे दिसून येत आहे.

# दादांना काळ दिसला होता

## २४ तासांपूर्वीच्या अजितदादांच्या देहबोलीबद्दल काय म्हणाले शिरसाट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८मुंबई : –** अजितदादांच्या विमान अपघाताची बातमी ऐकली तेव्हा वाटलं जखमी झालेले दादा बरे होतील. पण दादा गेल्याचं ऐकलं आणि धक्काच बसला. हा एक असा नेता होता




ज्याच्याशी बोलताना आदरयुक्त भीती वाटायची. खऱ्या अर्थाने ‘दादा’ हा शब्द त्यांच्यासाठी लागू होता. अनेक संकटे आली तरी ते डगमगले नाहीत. सर्व संकटांना त्यांनी एकट्याने तोंड दिले. या शब्दांत शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी अजित पवार यांच्याबद्दल आदर व्यक्त केला. त्याचवेळी मंगळवारी (२७ जानेवारी) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत दादांची देहबोली काही वेगळेच सांगत होती, असं सांगत शिरसाट यांनी वेगळेच संकेत दिले आहेत.मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नेहमीचे अजितदादा दिसले नाहीत. कॅबिनेटमध्ये हसूनखेळून राहणारे, कधी फिरकी घेणारे दादा काल (मंगळवारी) शांत होते. मी एका सहकाऱ्याला बोललोही की, दादाची आजची देहबोली चांगली वाटत नाही. त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव बरे नव्हते. कालच्या कॅबिनेटमध्ये अजित दादांचं अस्तित्व जाणवलं नाही. नाही म्हणायला ते एक-दोन विषयांवर बोललेही मात्र, ते नेहमीचे नव्हते. कदाचित त्यांना काळाची जाणीव झाली असावी. कॅबिनेट संपल्यावर ते निघून गेले, या शब्दांत संजय शिरसाट यांनी २४ तासांपूर्वीच्या दादांच्या देहबोलीबद्दल सांगितले.संजय शिरसाट म्हणाले, मी अजितदादांना अनेक वर्षे जवळून पाहिलं आहे. कुणाला काम सांगायचं असेल तर बिनधास्त मोठ्यानं सांगायचे, त्यांचा दरारा होता. त्यांनी कार्यकर्त्यांसाठी जीवाचं रान केलं. कार्यकर्त्यांना त्यातही बारामतीच्या कार्यकर्त्यांना ते नेहमी सांगायचे, मुंबईला येऊ नका मी शुक्रवारी तिकडे असतो ना! दादांचा बारामतीमधील वार ठरला होता. ते कार्यकर्त्यांना सांगायचे, उगाचच वेळ आणि पैसा खर्च करू नका, असे शिरसाट यांनी सांगितले.

# अजित पवारांच्या विमानाचा अपघात का झाला ?

## अखेर उघड होणार सत्य, ब्लॅक बॉक्स मध्ये काय सापडणार ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८बारामती–** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या निधनाने संपूर्ण देश हादरला आहे. बुधवारी सकाळी बारामती विमानतळाजवळ व्हीएसआर व्हेंचर्स विमान (नोंदणी क्रमांक व्हीटी-एसएसके) कोसळले. मोठा स्फोट झाला आणि विमान आगीच्या ज्वाळांनी वेढलं गेलं. या अपघातात विमानातील अजित पवार, पायलट कॅप्टन सुमित, फर्स्ट ऑफिसर शांभवी पाठक आणि फ्लाइट अटेंडंट पिंकी माळी या पाचही जणांना प्राण गमवावे लागले. या छोट्या चार्टर्ड विमानात ब्लॅक बॉक्स होता का? आणि त्याची तपासात मदत कशी होईल ? ते जाणून घेऊया. या विमानात ब्लॅकबॉक्स होता. लेअरजेट ४५ हे विमान अत्यंत कडक सुरक्षा मानकांनुसार (ऋ-ठ झरीं २५) बनवले आहे . त्यात फ्लाइट डेटा रेकॉर्डर (ऋऊठ) आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर (उतठ) दोन्ही आहेत, ज्यांना एकत्रितपणे ब्लॅक बॉक्स म्हणून संबोधले जाते.




ऊऋछ- ची टीम आता ब्लॅक बॉक्स परत मिळवेल आणि त्याची चौकशी सुरू करेल. रिपोर्ट्सनुसार, लहान आणि खाजगी विमानांवर ब्लॅक बॉक्स अनिवार्य नसतात. पण जर चार्टर्ड विमानाचे वजन एका विशिष्ट वजनापेक्षा (सामान्यतः ५,७०० किलोपेक्षा जास्त किंवा विमान वाहतूक प्राधिकरणाच्या नियमांनुसार) जास्त असेल किंवा जर ते व्यावसायिकरित्या वापरले जात असेल तर फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर असणे अनिवार्य आहे.

ब्लॅक बॉक्स हा विमानाचा सर्वात मजबूत भाग असतो, जो अपघातानंतरही सुरक्षित राहतो. त्याचे दोन मुख्य भाग असतात :

उतठ (कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर): हे वैमानिकांमधील शेवटचं संभाषण रेकॉर्ड करतं. अपघातापूर्वी कॉकपिटमध्ये कोणते अलार्म वाजले किंवा वैमानिकांनी कोणते आपत्कालीन संदेश दिले हे सीव्हीआर उघड करतं.

(फ्लाइट डेटा रेकॉर्डर): यामध्ये विमानाचा वेग, उंची, इंजिनची स्थिती आणि दिशा यासारख्या तांत्रिक डेटाची नोंद केली जाते.आश्चर्याची गोष्ट म्हणजे, याचं नाव ब्लॅक बॉक्स असलं तरी त्याचा रंग काळा नव्हे तर नारिंगी असतो. हा बॉक्स कोणत्याही ढिगाऱ्यात किंवा कचऱ्यात अथवा घनदाड जंगलात शोधणं सोपं व्हाव म्हणून याचा रंग असा नारिंगी असतो. त्यात एक बीकन देखील असतो जो पाण्याखाली किंवा जमिनीखाली असतानाही ३० दिवस सिग्नल पाठवत राहतो.

अजित दादांचा अपघात झाला ते विमान तडठ व्हेंचर्स कंपनीचं असून त्याचा इतिहास वादग्रस्त आहे,तपासाधीन आहे. २०११ मध्ये स्थापन झालेल्या या दिल्लीस्थित कंपनीचा १४ सप्टेंबर २०२३ रोजी मुंबई विमानतळावर विमान अपघात झाला होता. आता बारामतीच्या या दुर्घटनेनंतर, कंपनीच्या सुरक्षा ऑडिट आणि विमान देखभालीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**कसे उलगडणार गूढ ?**

या विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाल्यावर त्यातील डेटा कॉम्प्युटरवर डीकोड केला जाईल, ज्यामुळे अपघात तांत्रिक बिघाड, हवामान किंवा मानवी चुकीमुळे झाला आहे की नाही हे स्पष्ट होईल. ९७५२ किलो वजनाचे हे विमान लँडिंग स्ट्रिपपर्यंत का पोहोचू शकले नाही याचे उत्तर आता ब्लॅक बॉक्समध्ये अडकले आहे.

# अजित पवार यांच्या प्रायवेट चार्टर फ्लाईटमध्ये असलेल्या पिंकी माळी कोण?

## त्यांचं राष्ट्रवादी काँग्रेसशी काय कनेक्शन?




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८मुंबई–** बारामती एअरपोर्ट जवळ बुधवारी सकाळी अजित पवार यांचं खासगी प्रायवेट चार्टर विमान दुर्घटनाग्रस्त झालं. यात एअरक्राफ्ट स्टाफ पिंकी माळी यांच्यासह पाच लोकांचा मृत्यू झाला. या अपघातात अजित पवार यांच्यासह मुख्य पायलट सुमीत कपूर, पायलट शांभवी पाठक आणि चार्टर स्टाफ पिंकी माळी यांनी प्राण गमवले. पिंकी माळी प्रायवेट चार्टरमध्ये स्टाफ म्हणून कार्यरत होत्या. तिचे वडिल शिवकुमार माळी महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते आहेत.अपघाताच्या आदल्यारात्री पिंकी माळी यांनी आपल्या कुटुंबाशी संपर्क केला होता. उद्या बारामतीला जाणार असं तिने कुटुंबियांना सांगितलेलं. अजित पवार स्वत: आमच्याशी बोलले होते, असं कुटुंबियांचं म्हणणं आहे. पिंकी माळी यांचा मृतदेह मुंबईत आणून त्यांच्यावर अंत्यसंस्कार होतील असं महाराष्ट्र सरकारकडून कुटुंबाला आश्वासन देण्यात आलं आहे.

**रनवे ११ जवळ आपलं नियंत्रण गमावलं** विमानाने लँडिंग दरम्यान रनवे ११ जवळ आपलं नियंत्रण गमावलं. लँडिंगआधी जमिनीवर येऊन धडकलं. त्यामुळे विमानात मोठा स्फोट होऊन आग लागली. घटनास्थळी उपस्थित अधिकारी आणि स्थानिक लोकांनी सांगितलं की, अपघातानंतर विमानाच्या स्फोटाचे अनेक आवाज ऐकू आले. विमानाला आगीच्या ज्वाळांनी वेढलं होतं.

लियरजेट-४५ मॉडलच्या चार्टर्ड विमानांचे याआधीही अनेक अपघात झालेत. जगभरात या श्रेणीच्या विमानांचे जवळपास २०० अपघात झालेत. वर्ष २०२३ मध्ये मुंबईतही लियरजेट-४५ विमानाला अपघात झाला होता.

# मेडे मेडे मेडे अजित पवारांच्या विमान अपघातापूर्वी शेवटच्या क्षणी काय घडलं?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८बारामती** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला बारामती विमानतळाजवळ भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवार यांच्यासह विमानातील कर्मचारी आणि वैमानिकांसह एकूण पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. अजित पवार आज सकाळी मुंबईहून बारामतीसाठी चार्टर्ड विमानाने निघाले होते. बारामती विमानतळावर विमान उतरत असताना तांत्रिक बिघाड झाल्याने वैमानिकाचे नियंत्रण सुटले आणि विमान जवळच असलेल्या एका शेतात कोसळले. हा अपघात इतका भीषण होता की विमानाला भीषण आग लागली. यातच अजित पवारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आता अजित पवारांच्या विमान अपघातापूर्वी काय घडलं याची माहिती समोर आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अजित पवार यांनी मुंबई विमानतळावरून सकाळी विमानाने उड्डाण केले होते. सर्व काही सुरळीत सुरू होते. अजित पवारांच्या विमानाने बारामती विमानतळाच्या एअरस्पेसमध्ये प्रवेश करताच विमानातील तांत्रिक यंत्रणा कोलमडली. विमानात बिघाड झाल्याचे लक्षात येताच मुख्य वैमानिक कॅप्टन सुमित कपूर यांनी प्रसंगावधान राखले. त्यांनी विमानावर नियंत्रण मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

विशेष म्हणजे विमानाचे लोकेशन ट्रॅक करणाऱ्या रडारवरही हे विमान अगदी सुस्थितीत असल्याचे दिसत आहे. त्यावेळी पायलटने बारामती विमानतळावर विमानाचे लँडिग करण्याचा प्रयत्न केला. मात्र तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने त्याने पुन्हा वळसा घातला. यानंतर ते विमान पुन्हा फिरवून पायलटने परत विमान उतरवण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी ठरला. त्यानंतर दुसऱ्यांदा विमान धावपट्टीवर आणण्याचा प्रयत्न करत असतानाच विमानाचे नियंत्रण पूर्णपणे सुटले. त्यानंतर ते जमिनीवर कोसळले.

विमान कोसळण्यापूर्वी कॅप्टन सुमित कपूर यांनी एअर ट्रॅफिक कंट्रोलला (-ढउ) मेडे मेडे (चरू-वरू) असं म्हणत सिग्नल दिला होता. त्यावेळी त्याने काहीतरी तांत्रिक अडचण झाल्याचे सांगितले होते. हा सिग्नल म्हणजे वैमानिकाने मदतीसाठी मारलेली शेवटची हाक असते. हा शब्द फ्रेंच भाषेतील आहे. याचा अर्थ या आणि मला मदत करा असा होतो. जेव्हा विमानाचे इंजिन निकामी होते, विमानात आग लागते किंवा विमान क्रॅश होण्याची भीती असते, तेव्हा वैमानिक रेडिओवर तीन वेळा मेडे, मेडे, मेडे असा संदेश देतो.

विमान उतरवण्याची परवानगी देण्यात आली, पण


मेडे कॉल मिळताच, एटीसी इतर सर्व विमानांचे संपर्क थांबवून केवळ संकटात असलेल्या विमानाला प्राधान्य देते. धावपट्टीवर अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका तैनात केल्या जातात. विशेष म्हणजे ज्यावेळी मेडे कॉल देण्यात आला तेव्हा बारामतीमध्ये धावपट्टी मोकळी होती. त्यामुळे विमान उतरवण्याची परवानगी देण्यात आली होती. पण एटीसीने परवानगी देऊनही विमानातील बिघाड इतका मोठा होता की पायलटला सुरक्षित लँडिंग करता आले नाही. सर्व काही सुरळीत सुरू होते. अजित पवारांच्या विमानाने बारामती विमानतळाच्या एअरस्पेसमध्ये प्रवेश करताच विमानातील तांत्रिक यंत्रणा कोलमडली. विमानात बिघाड झाल्याचे लक्षात येताच मुख्य वैमानिक कॅप्टन सुमित कपूर यांनी प्रसंगावधान राखले. त्यांनी विमानावर नियंत्रण मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. विशेष म्हणजे विमानाचे लोकेशन ट्रॅक करणाऱ्या रडारवरही हे विमान अगदी सुस्थितीत असल्याचे दिसत आहे.या दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेता --खइ ने तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे

# आज अमरावती महापालिका, कार्यालयांना शासकीय सुट्टी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामतीत झालेल्या विमान अपघातात निधन झाले आहे. आज सकाळी ९ च्या सुमारात हा अपघात झाला. बारामती विमानतळापासून अवघ्या काही अंतरावर त्यांचे विमान कोसळले. अजित दादांच्या निधनामुळे महाराष्ट्र महाराष्ट्र सुन्न झाला आहे. अजित दादांच्या अकाली निधनामुळे सर्वांनाच धक्का बसला आहे. राज्यासह देशातील प्रमुख नेत्यांनी अजित दादांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात ३ दिवस शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे अमरावती महापालिकेला शासकीय सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.



अजित पवार यांच्या निधनामुळे आज राज्यात शासकीय सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'राज्यात आज शासकीय सुट्टी जाहीर केली आहे. त्यासोबत तीन दिवसाचा दिखवटा जाहीर करण्यात आला आहे. कधीही भरून न निघणारं असं नुकसान आहे. महाराष्ट्रातून असे लोकनेते गेल्यावर जी पोकळी तयार होते ती भरून काढणं अतिशय कठिण आहे. अजितदादा गेले यावर विश्वास ठेवायलाच मन तयार होत नाही. कारण अजित पवार हे जनतेच्या प्रश्नांसाठी सतत कार्यरत असायचे. लोकांमध्ये त्यांचा वावर असायचा.'

## दमदार आणि दिलदार मित्र गेला

अजित पवारांच्या निधनावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अजित पवार महाराष्ट्राचे लोकनेते होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेले, महाराष्ट्रातील प्रश्नांची जाण असलेला नेता होता. त्यांच्याबद्दल जनसमान्यांमध्ये प्रचंड मोठी आस्था होती. अजितदादा अतिशय संवेदनशील नेतृत्व होतं. अशा प्रकारचं नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्ष लागतात. ज्यावेळी ते महाराष्ट्राच्या विकासात अतिशय महत्त्वपूर्ण योगदान ते देत होते, त्यावेळी त्यांचं जाणं धक्कादायक आणि अविश्वसनीय आहे. माझ्यासाठी वैयक्तिक दमदार आणि दिलदार मित्र सोडून गेला आहे.

## अजितदादांच्या निधनानेमहाराष्ट्राची आणि माझीही वैयक्तिक हानी – पालकमंत्री संजय राठोड



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान अपघातातील निधनाने मोठा धक्का बसला. अजितदादांच्या निधनामुळे महाराष्ट्राची, संपूर्ण समाजाची आणि माझीसुद्धा प्रचंड मोठी वैयक्तिक हानी झाली आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली.

अजितदादा यांच्यासोबत काल मंगळवारीच कॅबिनेट बैठकीत भेट व चर्चा झाली आणि आज हा दुःखद प्रसंग घडला. ही घटना महाराष्ट्राला हादरविणारी आहे. आज परभणी येथे जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रचार सभा होती, त्यासाठी येथे आलो असताना अजित पवार यांच्या निधनाची दुःखद बातमी कळली आणि कोलमडून पडलो. परभणीतील सर्व कार्यक्रम रद्द करून बारामतीकडे निघाल्याचे संजय राठोड यांनी सांगितले.राज्याच्या विकासाबद्दल ते कायमच दूरदृष्टीने विचार करायचे. कधी मिश्कीलपणे तर कधी गांभीर्याने ते सूचना करायचे. आपलुकीच्या नात्याने सांभाळून घेणारे अजितदादा आपल्यात नाहीत ही भावना वेदनादायी आहे. राजकारणापलीकडे मित्रत्व आणि संबंध जपणारा असा लोकनेता पुन्हा होणे नाही. त्यांच्या अकाली निधनाने माझी वैयक्तिक आणि महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, संस्कृतिक क्षेत्राची झालेली हानी कधीही भरून निघणारी नाही. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि संपूर्ण पवार कुटुंबीयांवर ओढवलेल्या या दुःखातून सावरण्याचे बळ पवार कुटुंबियांना मिळो, हीच प्रार्थना असल्याचे मंत्री संजय राठोड म्हणाले.



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकस्मात निधनाची खबर अत्यंत हृदयदाहक आणि दुःखद आहे.आज सकाळी बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेत त्यांच्यासह इतर सहप्रवाशांचाही मृत्यू झाला.अजितदादांसारखे मजबूत,विकासाभिमुख आणि जनसंपर्क असलेले नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात दुर्मिळ होते.करारी नेतृत्व, दूरदृष्टी, कामाप्रती निष्ठा आणि प्रशासनावरची मजबूत पकड या सर्व गुणांचा संगम असलेले दादा कायम स्मरणात राहतील. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल.भावपूर्ण श्रद्धांजली

**अनिरुद्ध उर्फ बबलु देशमुख अध्यक्ष,अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण)**

# अजित पवारांचे पीएसओ विदीप जाधवांच्या घरी आक्रोश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ठाणे :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्यासह पाच जणांचा बारामतीत विमान अपघातात मृत्यू झाला. याच अपघातात अजित पवार यांचे सुरक्षारक्षक पोलीस हवालदार (पर्सनल सेक्युरिटी ऑफीसर, पीएसओ) विदीप जाधव यांचाही मृत्यू झाला. ते ४३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी संध्या (३८), मुलगी नेत्रा (१४) आणि मुलगा अद्वीत



(१०) असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने ते वास्तव्याला असलेल्या ठाण्यातील विटावा भागात शोककळा पसरली आहे.

या विमानात अजित पवार, विदीप जाधव (खासगी सुरक्षारक्षक), सुमित कपूर (पायलट कॅप्टन), संभवी पाठक (कॅप्टन) आणि पिंकी माळी (फ्लाईट अटेंडंट) हे प्रवास करत होते. जाधव हे विटावा येथील सूर्यानगर परिसरातील साई कृष्ण विहार इमारतीच्या बी-विंगमध्ये वास्तव्याला होते.

राज्यामध्ये पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद निवडणुकीसाठी रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळेच अजित पवार यांचा बुधवारी बारामती दौरा होता. याच दौऱ्यामध्ये मुंबई पोलीस दलातील हवालदार जाधव यांचीही त्यांच्यासमवेत पीएसओ म्हणून डयूटी होती.

# ...म्हणूनच अजितदादांना बारामतीचा विमानतळ लँडिंगसाठी सेफ करायचा होता...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८बारामती** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राने केवळ एक कणखर प्रशासकच नाही, तर राज्याच्या विमानचालन क्षेत्राचा कायापालट करू इच्छिणारा एक द्रष्टा नेता गमावला आहे.

अत्यंत विदारक बाब म्हणजे, ज्या बारामती विमानतळावर सुरक्षित लँडिंगसाठी आधुनिक यंत्रणा बसवण्याचे निर्देश त्यांनी अवघ्या काही महिन्यांपूर्वी दिले होते, त्याच धावपट्टीवर काळाने त्यांच्यावर झडप घातली.आजपासून बरोबर चार महिन्यांपूर्वी, ऑक्टोबर २०२५




मध्ये अजित पवार यांनी मंत्रालयात एक विशेष बैठक घेतली होती. या बैठकीत त्यांनी बारामती विमानतळासह राज्यातील इतर छोट्या विमानतळांच्या विकासाचा आराखडा तयार केला होता. विशेषतः रात्रीच्या वेळी सुरक्षित लँडिंग, रडार यंत्रणा आणि धावपट्टीवरील दिवे या तांत्रिक सोयी तातडीने पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी 'महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी'ला दिले होते.

## महाराष्ट्राच्या राजकारणातील धडाडीचा नेता हरवला – प्रविण पोटे



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमानाला झालेल्या भीषण अपघातात त्यांचे अकाली निधन झाल्याची कल्पनाच अत्यंत दुःखद, धक्कादायक आणि मन सुन्न करणारी आहे.अजितदादा पवार हे महाराष्ट्रातील लोकनेते होते. राज्याच्या प्रत्येक कानाकोपऱ्याची सखोल माहिती असलेला, जनसामान्यांमध्ये प्रचंड विश्वास आणि आस्था निर्माण करणारा असा हा नेता होता. महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय वास्तवाची त्यांना अचूक जाण होती. त्यांच्याशी माझे कौटुंबिक संबंध होते. प्रशासनावर त्यांची मजबूत पकड, निर्णयक्षमता आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे ते एक धडाडीचे व प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेऊन ते सातत्याने कार्यरत होते.त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक कणखर, शिस्तबद्ध, वक्तशीर आणि कार्यतत्पर नेतृत्व गमावले असते. अशी पोकळी कधीही भरून न निघणार नाही.त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली..

## महाराष्ट्राचा लोकनेता हरपला



उपमुख्यमंत्री अजित पवार यांना राज्याचा काना – कोपरा माहिती होता, प्रत्येक गोष्टीचा बारीक तसेच गाढा अभ्यास त्यांचा होता. जनसामान्याचे ते नेते होते. मतदार संघातील प्रश्न त्यांच्याकडे घेऊन गेल्यावर ते त्वरित निर्णय घेत असत. महाराष्ट्राच्या विकासात त्यांचा मोठा वाटा होता. स्पष्ट वक्ता, निर्भीड व संघर्षशील व्यक्तिमत्व धडाडीचा नेता म्हणून त्यांची ओळख होती राज्याच्या मनाला चटका लावणारी ही घटना आहे दादांच्या जाण्याने ही राजकारणातील भरून न निघणारी पोकळी आहे.

**– प्रतापदादा अडसड आमदार ४३धामणगाव रेल्वे**

## अजित दादा पवार यांचे निधन महाराष्ट्रासाठी मोठा धक्का ;यशोमती ठाकूर



महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. या दुःखद घटनेनंतर काँग्रेस नेत्या व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी तीव्र दुःख व्यक्त करत भावनिक प्रतिक्रिया दिली.यशोमती ठाकूर म्हणाल्या, अजित दादांचे असे एकाएकी जाणे हे संपूर्ण महाराष्ट्र आणि देशासाठी अत्यंत धक्कादायक आहे. अजित दादा हे करारी, शिस्तप्रिय आणि लोकांमध्ये राहून लोकांची कामे करणारे नेते होते. सकाळी उठून नियमबद्ध जीवन जगणे, स्वतः शिस्तीत राहणे आणि इतरांनाही शिस्तीची सवय लावणे, ही त्यांची ओळख होती.त्या पुढे म्हणाल्या की, लोकांच्या प्रश्नांशी थेट संपर्क ठेवणारा, प्रशासनावर पकड असलेला आणि निर्णयक्षम असा एक मोठा नेता आज आपल्यातून निघून गेला आहे. त्यांच्या जाण्याने राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. या क्षणी शब्द कमी पडत आहेत.अजित दादा पवार यांच्या निधनामुळे केवळ एका पक्षाचे नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले असल्याची भावना यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केली. त्यांनी अजित दादांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या.

## अजित दादा पवार अतिशय धाडसी, परखड आणि कामाचा माणूस होते ;बच्चू कडू



अजित दादा पवार यांच्या निधनाच्या दुःखद बातमीनंतर प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख व माजी मंत्री बच्चू कडू यांनी तीव्र शोक व्यक्त करत दादांच्या आठवणींना उजाळा दिला. या घटनेने आपल्याला मोठा धक्का बसल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.बच्चू कडू म्हणाले, अजित दादा यांच्यासह सहा जणांचा मृत्यू झाल्याची बातमी समजली आणि मन हेलावून गेले. अजित दादा हे अतिशय धाडसी, परखड, स्पष्टवक्ते आणि कामाचा माणूस होते. ते नेहमी कार्यकर्त्यांसाठी धावून जाणारे नेते होते.आपल्या मतदारसंघातील अनुभव सांगताना त्यांनी म्हटले की, माझ्या मतदारसंघातील ३३ गावे योजनांमध्ये बसत नव्हती. यासंदर्भात दादांसोबत बैठक झाली आणि दादांनी ठामपणे सांगितले की ही गावे घ्यावीच लागतील. तसेच अचलपूर-परतवाडा शहराची योजना निधीअभावी रखडली होती, तीही अजित दादांनी पुढे नेऊन सुरू केली.पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, दादांच्या अशा अचानक आणि दुःखद निधनाने मोठा झटका बसला आहे. मनातून अत्यंत दुःख होत आहे. प्रहार संघटना आणि मी स्वतः बच्चू कडू म्हणून अजित दादांना भावपूर्ण शब्दांजली अर्पण करतो.



आज अत्यंत कणखर, जे बोलेल तेच करणारे, आपल्या वक्तशीरपणाबाबत कटिबद्ध असलेले, परखड वक्तृत्वशैलीतून दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व करणारे एक महान व्यक्तिमत्त्व आपल्यातून कायमचे निघून गेले आहे. माझ्यासारख्या सामान्य व बहुजन कुटुंबातील तरुणाला राज्यपातळीवर कार्य करण्याची संधी दादांकडून मिळाली, ही माझ्या जीवनातील मोठी प्रेरणा आहे.दादांच्या जाण्याने आज केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर संपूर्ण देशाच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. माझ्यासारख्या असंख्य तरुणांना घडवणारे, मार्गदर्शन करणारे दादा म्हणजे एक चालते-बोलते विद्यापीठच होते. प्रत्येक विषयावर त्यांचे बारकाईने लक्ष असे. प्रशासनावर चांगली पकड असणारे व वेळेवर काम पूर्ण करून घेण्याचा त्यांचा हातखंडा होता. अत्यंत खडक असलेली दादा मनाने अत्यंत मऊ होते याचा मला एकदा अनुभव आला.दादांच्या जाण्याने निर्माण झालेली ही पोकळी कधीही भरून निघणार नाही. त्यांच्या विचारांचा, कार्याचा आणि संस्कारांचा वारसा आम्ही पुढे नेऊ, हीच त्यांना खरी श्रद्धांजली.


**-संतोष महात्मे ग्रामीण जिल्हाअध्यक्ष.**

## शब्दाला पक्का असणारा नेता काळाच्या पडद्याआड गेला!



अजित दादांच्या शिवाय महाराष्ट्राचे राजकारण!, याबाबत कल्पना देखील करवत नाही!महाराष्ट्राने आज एक खंबीर नेता आणि कणखर प्रशासक गमावला आहे.अजितदादा पवार यांचे कार्य, त्यांची धडाडी, निर्णयक्षमता आणि जनतेसाठी असलेली तळमळ कायम स्मरणात राहील. विकासासाठी झटणारा, कठोर पण स्पष्ट भूमिका घेणारा नेता अशी त्यांची ओळख होती.या दुःखद प्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांप्रती आणि असंख्य समर्थकांप्रती मनापासून सहवेदना व्यक्त करते.ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि कुटुंबाला हे अपार दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

**– चेतन गावंडे )नगरसेवक तथा माजी महापौर.अमरावती**



अजित दादांची बातमी ही धक्कादायक आहे! शब्दच नाहीत.दादांसोबत गेले ५-६ वर्षं काम करण्याची संधी मिळाली पहिलं सरकारमध्ये आणि नंतर काही दिवस विरोधी पक्षात. त्यांची विधिमंडळ कारभारावर असलेली रुबाबदार पकड आणि प्रेमळ स्वभाव हा आमच्यासारख्या अनेकांना आवडायचा. मी हे विरोधी पक्षात असताना देखील अनेकदा जाहीरपणे म्हटलं होतं.आजची बातमी खरंच धक्का देणारी आहे.अजित दादांना आणि दुर्घटनेतील त्यांच्या सहकाऱ्यांना विनम्र श्रद्धांजली.

**आदित्य ठाकरे**

## मी स्तब्ध आहे, आम्ही पोरके झालो –आ.सौ. सुलभाताई खोडके



५०अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनाने मी स्तब्ध आहे. आम्ही आज पोरके झालो. एक पाठीराखा, दिशादर्शक नेतृत्व, कुशल मार्गदर्शक, व महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी, समृद्धीसाठी अविरतपणे आजीवन धडपड करणाऱ्या एका लढवय्या लोकनेत्याला आज आम्ही मुकलो आहोत. आमचा नेता आज काळाच्या पडद्याआड हरपला. केवळ महाराष्ट्रानेच नाही तर देशाने आज एक महान सुपुत्र गमावला आहे.हि फार मोठी क्षती असून धक्कादायक व अजूनही विश्वास न बसणारी घटना. आज क्रूर काळाने घात करून आमच्या दादांना आमच्या पासून हिरावून घेतले. काळ इतका कठोर होईल असे वाटलं नव्हते. पण सत्य हे स्वीकारावेच लागेल. अजितदादा आमचा कणा होते. ते केवळ एक राजकारण म्ह्णून नाही, तर खोडके परिवाराच्या सुख-दुःखाचे सोबती होते. त्यांनी नेहमीच अमरावतीला विकासात्मक दृष्टीने भरभराटी येण्यासाठी फार काही दिले आहे. दादांनी प्रत्येक माणसाच्या मनावर एक अमिट छाप सोडली असून ते सदैव आमच्या स्मरणात राहतील. मी त्यांना श्रद्धांजली देत असून दुःख व्यक्त करत आहे.– **सौ.सुलभा संजय खोडके आमदार, अमरावती–**

# मोडक्या शाळेत वर्ग नाही भरणार, जुनी इमारत पाडून नवीन बांधणार

## पटसंख्येनुसार इमारती उभारणार

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती–**
राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून मोडकळीस आलेल्या व धोकादायक झालेल्या शाळांच्या इमारती पाडण्यात येणार आहेत. याबाबत ग्रामविकास विभागाने आदेश जारी केले आहेत. पाडलेल्या शाळांच्या जागांवर नवीन इमारती प्रस्तावित आहेत. त्यामुळे मोडक्या शाळेत वर्ग भरणार नाही. लवकरच जुनी इमारत पाडून नवीन बांधली जाणार आहे.मोडकळीस आलेल्या, धोकादायक शाळा इमारती व वर्गखोल्या निर्लेखित करण्याचा प्रस्ताव आतापर्यंत सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधीक्षकांकडे पाठवावा लागत होता. त्यांच्या परवानगीला विलंब होत होता. परिणामी मोडकळीस आलेल्या शाळा इमारतींच्या नवीन बांधकामासही वेळ लागत होता. परंतु, आता शासनाने सुधारित निर्देश दिल्याने स्थानिक स्तरावर शाळा इमारत निर्लेखन करता येणार आहे.वर्गखोल्या पाडण्यासाठी एसओपी तयार केली आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व कार्यकारी अभियंत्यांच्या अभिप्रायानंतर सीईओंकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविणे, सीईओंच्या मंजुरीनंतर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेतल्यानंतर पाडकामाची प्रक्रिया राबवावी, असे स्पष्ट केले आहे. पाडकामानंतर संबंधित जागेवर अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे आदेशही शासनाने दिले आहेत

### ...अशी होणार निर्लेखन व पाडकामाची प्रक्रिया

निर्लेखित केल्या जाणाऱ्या इमारतीचे बांधकाम वर्ष, जागेची मालकी, खर्च, क्षेत्रफळ, सद्यःस्थिती, घसारा मूल्यांकन व इमारत पाडण्याची आवश्यकता यांचा तपशीलवार प्रस्ताव करणे आवश्यक आहे. घसारा मूल्य ५० हजार ३ रुपयांपेक्षा कमी असलेल्या शाळा इमारती पाडण्याचे अधिकार पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

### मोडकळीस आलेल्या इमारती पाडल्या जाणार

स्ट्रक्चरल ऑडिटनंतर शाळा इमारती व वर्गखोल्या पाडण्याबाबत ग्रामविकास विभागाने परिपत्रक काढून सर्व जिल्हा परिषदांना एकसमान कार्यपद्धती (स्टैंडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर) अंमलात आणण्याचे निर्देश दिलेले आहेत.

**जि. प. शाळांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट**

जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्यामोडकळीस आलेल्या शाळा.इमारतींबाबत संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनी सविस्तर प्रस्ताव तयार करावा. उपअभियंता (बांधकाम) यांच्यासह संयुक्त तपासणी करून इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट सादर करणे बंधनकारक केले आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत